# लोकनाट्य – दशा व दिशा

**डॉ. शरद मेश्राम**
शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय
अर्जुनी/मोरगाव जि. गोंदिया
मोबाईल नं - ९४०४२७९७९९

---

मानवी संस्कृती आणि लोकसाहित्य व लोकनाट्य यांचा अविभाज्य असा संबंध आहे. कोणत्याही संस्कृतीचा सर्वांगीण अभ्यास करून पाहिले तर त्या संस्कृतीच्या उत्क्रांतीच्या प्रवासाचे नेमके प्रतिबिंब त्या संस्कृतीच्या लोकसाहित्यात पडलेले असते असे संशोधकांना वाटते. त्यामुळे लोकसाहित्य, लोककला आणि लोकनाट्य यांच्या अभ्यासाचे महत्त्व आजच्या आधुनिक आणि वैज्ञानिक काळातही अनन्यसाधारण असे आहे. आजच्या या काळामध्ये या सर्व प्राचीन प्रकारांकडे दुर्लक्ष होत असले तरी मनोरंजन, प्रबोधन आणि अस्सल जीवनमूल्यांची शिकवण अंगभूत असल्याने या लोककला आजही आपले महत्त्व टिकवून असल्याचे आपल्याला दिसून येते.

मनोरंजन ही मानवाची मूलभूत गरज असल्याचे म्हटले जाते. श्रमपरिहार आणि मनोरंजन या लोकसाहित्याच्या निर्मितीमागील प्रेरणा असल्या तरी कलात्मक आत्माविष्कार ही सुद्धा त्या मागील एक प्रमुख प्रेरणा असल्याचे दिसते. म्हणूनच लोकसाहित्य म्हणजे लोकांच्या जीवन जगण्याची पद्धती, त्यांची जगण्याची शैली तसेच त्यांच्या जीवनाची अलिखित मूल्यव्यवस्था असते असेही म्हटले जाते.

महाराष्ट्रात प्राचीन काळी करमणुकीचे विविध प्रकार असल्याचे आढळून येते. ग्रामीण भागामध्ये आपल्याला आजही लोककलांचे वेगवेगळे प्रकार दिसतात. सर्वसामान्य, परंपरागत व्यवसाय करणारा ग्रामीण भागातील माणूस आणि लोकसाहित्य यांचे अगदी जवळचे नाते आहे. लोककलांचे असे एक ना अनेक प्रकार गेल्या अनेक शतकांपासून प्रचलित असल्याचे अनेक पुरावे सापडतात. सर्वसामान्य लोकजीवन आणि लोककला यांचे अतूट असे नाते आहे. अशा या ग्रामीण जीवनातून निर्माण झालेल्या लोककला म्हणजे समूहमनाचा तो आविष्कार असतो. या सर्व लोककला परंपरेनेच समूहनिर्मित असतात आणि समूहाश्रयी असतात. या सर्वच प्राचीन लोककलाप्रकारांवर धार्मिक चालीरितींचा फार मोठा पगडा असतो व त्याद्वारे सांस्कृतिक जीवनाचा वारसा जतन करण्याचे फार मोठे कार्य या लोकसाहित्यातून किंवा लोकनाट्यातून घडविले जाते.

या सर्व लोककला परंपरागत पद्धतीने चालत आलेल्या असल्याने तसेच आजच्या आधुनिक काळातही फार बदल न स्वीकारल्यामुळे या कलांमध्ये काही दोषही आढळून येतात. ग्रामीण भागातील लोकांसमोर सादर केल्या जाणाऱ्या या लोककलांचे मौखिक पद्धतीने जतन झालेले असल्याने, त्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे आलेल्या असल्याने आणि त्यांची निटनेटकी संहिता नसल्यामुळे त्या कलांमध्ये असलेला लवचिकपणा, त्यातील उत्स्फुर्तता, नियोजनबद्धता, बंधनरहितता, ओबडधोबडपणा असे काही दोष दिसतात. पण या दोषांकडे दुर्लक्ष करून त्यातील आशय, त्यातील अभिव्यक्ती, आणि ग्रामीण जीवनावर त्यातून घडून येणारे संस्कार याकडे आपल्याला अधिक लक्ष द्यावे लागते.

प्राचीन काळापासून चालत आलेल्या या लोककला या कोणत्या ना कोणत्या विधींमधून निर्माण झाले

Research Hub International Journal

असल्याचे समजते. धर्माचे प्रचंड प्राबल्य असलेल्या पूर्वीच्या काळातील समाज हा अनेक विधी पाळणारा असा होता. आणि अशाप्रसंगी विधी म्हणून अश कला किंवा 'विधीनाट्य' सादर केल्या जात असत. पण हळूहळू पुढील काळामध्ये या विधीनाट्यातील विध्यात्मकता कमी होऊ लागली आणि त्यातील नाट्यात्मकता वाढीला लागली. काळानुरूप त्या विधीनाट्यातील धर्मश्रद्धा गौण होऊ लागली आणि त्यातील नाट्य हे प्रमुख होऊ लागले. 'बहुजनांचे विषय होऊन बहुजनांच्या मनोविनोदनासाठी बहुजनांतील काही कलावंतांनी सादर केलेले सहज सुलभ नाट्य म्हणजे लोकनाट्य' अशा स्वरूपाची व्याख्या लोकनाट्याच्या संदर्भात आपल्याला आढळून येते.

'लोकनाट्य' या शब्दाला इंग्रजी पर्यायी शब्द FOLK DRAMA असा आढळतो. तर 'एनसायक्लोपिडीया ब्रिटानिका' या ग्रंथात FOLK या शब्दाचा अर्थ अप्रगत, असंस्कृत, अविकसित लोकसमूह असा दिलेला आहे. लोकनाट्य हा शब्द लोक आणि नाट्य या दोन शब्दांपासून तयार झाला असल्याचे दिसते. एकूणच 'सामान्य जनांनी सामान्य जनांसाठी निर्माण केलेली लोककला म्हणजे लोकनाट्य' असे आपल्याला म्हणता येऊ शकेल.

लोकनाट्य ही विधींमधून निर्माण झाली असली तरी पुढे या विधीनाट्यांना रंजनप्रधान रूप प्राप्त होते आणि त्यातून लोकनाट्याची निर्मिती होते. लोकनाट्य ही स्वाभाविक स्वरूपाची अस्सल कला आहे. त्यात काडीमात्रही कृत्रिमता दिसून येत नाही. या अशा लोकनाट्यातून प्रदेशपरत्वे, कलात्मक आविष्कार घडून येतांना दिसतो. या लोकनाट्यातून आपला सांस्कृतिक वारसा जपला जातो. या कलाप्रकारांचा संबंध धार्मिक चालीरितींशी असला तरी खऱ्या अर्थाने आधुनिक रंगभूमीचा मूलस्त्रोत म्हणजे ही परंपरागत अशी लोकनाट्येच होत असेच आपल्याला म्हणावे लागते.

प्राचीन भारतीय नाट्य परंपरेचा जर विचार केला तर या भारतीय परंपरेने नाटकाला मनोरंजनाचे साधन कधीच मानले नाही तर त्याला सदैव धार्मिकतेचे अधिष्ठान मानले असल्याचे दिसते. एकूणच नाट्याची बीजे ही मानवी जीवनात असलेल्या धर्मभावनेतून बद्धमूल झालेली असल्याचे संदर्भ आपल्याला सापडतात. या प्राचीन नाटकांवरही धर्माचा प्रभाव असल्याचे दिसते. प्राचीन काळी केव्हातरी प्रचलित असलेल्या धार्मिक विधीतून निर्माण होऊन कालपरत्वे त्याची बदलत आलेली रूपे लोकनाट्याच्या स्वरूपाने आपल्याला दिसतात. लोकनाट्याचा विचार करतांना विधीनाट्य - विधीमुक्तनाट्य - लोकनाट्य असा लोकनाट्याचा उगम आणि प्रवास असल्याचे डॉ. तारा भावाळकर सांगतात.

लोकनाट्य हे लिखित स्वरूपात आढळून येत नाहीत. लोकनाट्याचे स्वरूप हे मौखिक, परंपरागत आहे. ते लिखित नसल्याने त्यात स्थळानुसार, काळानुसार बदल घडून येऊ शकतो. या लोकनाट्याचा प्रत्येकच प्रयोग हा नित्यनूतन, वर्तमान असल्याने त्यातील कलावंत आपल्या पद्धतीने त्यात कमीअधिक बदल घडवून आणू शकतात. अशाप्रसंगी आपल्या बोलीभाषेच्या उपयोगाने, ओघवत्या आणि सहज पद्धतीने आपली कला सादर करतात. अशावेळी त्या कलावंतांचा हजरजबाबीपणा, त्याची समयस्फुर्तता, ही अतिशय महत्त्वाची असते. ही लोकनाट्ये सादर करणारे कलावंत हे व्यावसायिक किंवा प्रशिक्षित नसतात तर ते त्या परिस्थितीत घडलेले असतात. अशा कलांचे संस्कार त्यांच्यावर बालपणापासूनच झालेले असतात. त्यामुळे त्यांच्या अभिनयात एक प्रकारची नैसर्गिकता अथवा स्वाभाविकता दिसून येते. आणि असा अस्सल अभिनय, अभिनयातील स्वाभाविकपणा हाच लोकनाट्याचा

महत्त्वपूर्ण असा विशेष आहे. ग्रामीण भागात राहणारे आणि आपले नित्य, दैनंदिन कामे करणारे हे कलावंत आपली कला व्यवसाय म्हणून नाही तर 'कला' म्हणूनच सादर करतात. या लोककलावंतांजवळ अस्सल आणि प्रमाण अशी भाषा नसते. प्रमाण भाषेवर त्यांचे प्रभुत्व नसले तरी या कलेसाठी आवश्यक असलेली अशी बुद्धिमत्ता, तर्कशक्ती, विनोदबुद्धी याशिवाय त्यांच्याजवळ असलेला ताजेपणा, सदा प्रसन्नता, टवटवीतपणा या गुणांमुळे ते आपली कला अधिक चांगल्या पद्धतीने सादर करू शकतात. आणि म्हणूनच त्यांच्या राहणीमानात एक प्रकारचा जिवंतपणा असल्याचे आपल्याला दिसते.

या लोकनाट्यातील लोककलावंतांचा अभिनय, त्यांचे गायन, त्यांचे नृत्य यामध्ये एक सातत्यता किंवा ओघवतेपणा दिसून येतो. हे पारंपरिक पद्धतीने आणि अथक कष्टाने तयार झालेले कलावंत आपल्या कलेत इतके तरबेज झालेले असतात की त्यांना सरावाचीही आवश्यकता नसते. त्यांच्यातील लवचिकता ही अतिशय आश्चर्यकारक असल्याचे दिसते. या अशा लोककलांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात धार्मिक व प्रबोधनात्मक असे कार्य घडून आले आहेत. अशा ग्रामीण भागात मोठ्या उत्साहाने सादर होणाऱ्या या लोककला म्हणजे सर्वसामान्य बहुजन समाजाचे ते प्रातिनिधिक नाट्य आहे. या लोकनाट्याचे स्वरूप हे भावनिक असल्याने ग्रामीण भागातील सर्वसामान्य बहुजन लोकांना ही लोकनाट्ये आपली आणि अगदी जवळची वाटतात. या लोकनाट्यामधून वैयक्तिकतेपेक्षा सामाजिकतेकडेच अधिक लक्ष केंद्रित केलेले असतात.

या लोककलांना आदिम आधार आहे. मनोरंजन आणि समाजप्रबोधन या प्रेरणांच्या आधाराने विकसित झालेल्या या लोककलांना तर चिरंजिवित्व प्राप्त झाले आहे. अशी ही परंपरेने चालत आलेली, आधुनिकतेचा स्पर्शही न झालेली ही लोकनाट्ये ग्रामीण लोकांची नैतिक, भावनिक, रंजनात्मक भूक भागविणारे, त्यांच्या समग्र आंतरव्यक्तिमत्त्वास पूर्णपणे व्यापून टाकणारे असे एक प्रभावी माध्यम आहे. त्यात उपदेष, नीतिबोध, व्यवहारज्ञान यांचेही तत्वज्ञान सामावलेले आहे. एका अर्थाने ग्रामीण जीवनाला नीतिबोधाची, माणुसकीची शिकवण ही लोकनाट्यातून मिळत असते. ग्रामीण जीवनाला उदात्त ध्येयाची प्रेरणा देण्याचे माठे कार्य हे लोकनाट्य व त्यातील कलावंतांमार्फत घडविल्या जाते. ही लोकनाट्य सर्वसामान्य ग्रामीण लोकांच्या जीवनप्रवाहाला उज्ज्वल दिशा देण्याचे महान कार्य करतात असे म्हणणे चूक ठरू नये. निखळ मनोरंजनासोबतच नव्या पिढीवर योग्य असे संस्कार, थोर, महान लोकांचे विचार पटवून देण्याचा प्रयत्न या लोकनाट्यातून होत असल्याचे आपल्याला दिसून येते. एकूणच या देशातल्या खऱ्या  माणसाला, या देशाच्या मातीशी, ग्रामीणतेशी, अस्सल भारताशी जोडण्याचा प्रयत्न या लोकनाट्यातून घडून येतो असे म्हटल्यास चूक ठरणार नाही.

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागामध्ये लोककलांचे अनेक प्रकार गेल्या अनेक शतकांपासून प्रचलित आहेत. ग्रामीण भागातील सर्वसामान्य लोकांच्या जीवनात या लोककलांना, लोकनाट्यांना अतिषय महत्त्वाचे स्थान असल्याचे दिसते. सर्वसामान्य लोकजीवन आणि लोकनाट्य यांचे अगदी जवळचे नाते आहे. आजच्या काळात मानवाची मनोरंजनाची गरज भागविणारे अनेक माध्यमे उपलब्ध असली आणि या परंपरागत लोकनाट्याकडे आजच्या काळात दुर्लक्ष होत असले तरी त्यांचे महत्त्व कमी होत नाही. लोकनाट्य हे शब्द, संगीत, नृत्य, गीत इ. नाट्यगुणांनी सादर केली जाणारी एक संमिश्र स्वरूपाची प्रयोगात्म अशी लोककला आहे. प्राचीन महाराष्ट्रात गोंधळ, लळित, दशावतार, दंडार, गंगासागर, दंडीगाण, तुमडीगाण, तमाशा, खडी गंमत, डहाका अशी अनेक

विधीनाट्य, लोकनाट्य अस्तित्वात होती याचे आपल्याला पुरावे सापडतात. अशा या लोकनाट्यामध्ये भूतकाळ आणि भविष्यकाळ यांचा वर्तमानकाळाशी समन्वय घडवून आणण्याची शक्ती होती असेही आपल्याला म्हणता येईल. मात्र आज कालौघात वरीलपैकी अनेक कला, नाट्य लोप पावलेली आहेत. दंडीगाण, तुमडीगाण, गंगासागर या कला तर जवळजवळ नष्टच झाल्या आहेत आणि आधुनिकतेच्या या काळात उर्वरित लोककलांचेही अस्तित्व धोक्यात आलेले असल्याचे दिसते.

ज्या लोककलांनी, लोकनाट्यानी गेली कितीतरी वर्षे ग्रामीण सर्वसामान्य समाजावर आपले प्रभुत्व गाजविले, त्यांना जगण्याची नवी शिकवण दिली, त्यांना नीतिमूल्ये शिकविली, त्यांचे प्रबोधन केले अशा या लोकनाट्यामध्ये असे काय होते की ज्यामुळे अगदी आता आता पर्यंत या लोकनाट्याचा प्रभाव समाजावर असल्याचे दिसते. याचाही आपल्याला विचार करावा लागतो. त्यासाठी या लोकनाट्याच्या स्वरूपाचा आणि त्यात सादर केल्या जाणाऱ्या कथानकाकडे आपल्याला लक्ष द्यावे लागते. एकूणच ही सारी लोकनाट्ये धार्मिक, पौराणिक, ऐतिहासिक, लौकिक आणि सामाजिक अशा स्वरूपाची होती असे दिसते. त्यात सादर केले जाणारे कथानक हे गद्य, पद्य मिश्रित स्वरूपाचे असायचे. यात पद्यांना जितके महत्त्व होते तितकेच महत्त्व परस्परातील संवाद, आणि पद्यांशाचा अर्थ समजावून सांगण्याचा प्रकार यातून त्या नाट्याचे कथानक प्रेक्षकांपुढे सादर केले जाई. सर्व लोकनाट्य ही पारंपरिक स्वरूपाची असल्याने त्यात पौराणिक कथांशिवाय त्या त्या प्रदेशातील लोककथांवर आधारलेले विषय सुद्धा असायचे आणि म्हणूनच या सर्व गोष्टींचा प्रभाव सामान्यांवर पडून त्यांचे या लोकनाट्यातून मनोरंजन तर व्हायचे शिवाय जीवनविषयक शिकवणही त्यांना मिळायची.

अशा या लोकनाट्याची कथा अलिखित असल्याने त्यांना सलग असे कथानक असल्याचे दिसत नाही. मात्र जे कथाबीज असेल त्यात ओघवतेपणा आणि सातत्यता मात्र निश्चितच दिसून येतो. या लोकनाट्यामधून समकालीन सामाजिक जीवनातील अनिष्ट अशा रूढी, प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा, ढोंगी साधू, इ. सोबतच पौराणिक आदर्श अशी पात्रे, त्यांची महानता, इ. चे वर्णन या लोकनाट्यातून केले जाते. या अशा विविधांगी आणि ग्रामीण सामाजाशी निगडित अशा विषयांवर लोकनाट्य सादर केल्याने त्याचा अतिशय चांगला प्रभाव लोकांवर पडतो. एकप्रकारे चांगल्या मनोवृत्तींचे, सहकार्याचे, परस्परांच्या मदतीचे, नीतिमूल्यांचे, वडिलधाऱ्या व्यक्तींच्या आदराचे शिक्षण अशा  लोकनाट्यांतून दिले जाते. एकूणच समाजाच्या जडणघडणीसाठी या लोकनाट्याची भूमिका व त्याचे योगदान अतिशय महत्त्वाचे असल्याचे दिसून येते.

ही लोकनाट्य समाजमनावर अतिशय प्रभावीपणे आपला जो ठसा उमटवितात त्यासाठी लोकनाट्याचे आणखी काही घटक तितकेच महत्त्वपूर्ण आहेत. यामध्ये नाट्य, संगीत, व नृत्य यांचाही आपल्याला समावेश करावा लागतो. या घटकामुळेही आपली संहिता, आपला कथासार लोकांपर्यंत पोचविणे लोककलावंतांना अधिक सोयीचे होते. अशिक्षित आणि ग्रामीण समाजावर संगीत, नृत्य व पद्य यांचा चांगला प्रभाव पडत असतो. अशा पद्धतीने गेल्या अनेक शतकांपासून ही लोकनाट्ये ग्रामीण समाजाच्या मनोरंजनासोबतच त्यांना शिकवण देण्याचे कार्य करीत आहेत. परंतु आजच्या या जागतिकीकरण, आधुनिकीकरण आणि संगणकाच्या काळात ही लोकनाट्य वा संपूर्ण लोकसाहित्य नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. या साऱ्याच प्रकाराकडे एक मराठी वाचक, लेखक, वा मराठी भाषिक म्हणून आपल्याला सावध राहून ही लोकनाट्ये,  त्यांचे वेगळेपण टिकवून ठेवण्याच्या दृष्टीने कोणते ना

Research Hub International Journal

कोणते प्रयत्न सुरू ठेवणे, या संदर्भात जागरूकता निर्माण करणे अतिशय आवश्यक होऊन बसले आहे.

आजच्या या आधुनिक यंत्रयुगामध्ये सर्वत्र फार मोठ्या प्रमाणात आपल्याला बदल घडून येत असल्याचे दिसतात. आज लोकांची जीवनपद्धती, आवडनिवड, मूल्यव्यवस्था, साऱ्याच गोष्टी मोठ्या झपाट्याने बदलत चालल्या आहेत. धर्मांचे प्राबल्य आजच्या काळात काही प्रमाणात कमी झाल्याचेही दिसून येत आहे. लोकांच्या व्यवसायात, आचारविचारात मोठे बदल घडून येत आहेत. नव्या श्रद्धा उदयाला येऊ पाहत आहेत. अशा परिस्थितीमध्ये मरणपथाला लागलेल्या या लोककलांचे जतन करणे, त्यांचे संवर्धन करणे, त्यांना पूरक अशी परिस्थिती निर्माण करून देणे हे महत्त्वाचे ठरते. या कालबाह्य होऊ पाहणाऱ्या लोककलांना आमच्या आजच्या जीवनसंदर्भात अतिशय महत्व आहे. या लोककलांमधून समूहमनाच्या धारणा आणि समूहमनांच्या भावभावनांचा जो आविष्कार झालेला दिसतो त्यातून आजचे समूह जीवन, त्या समूहजीवनाची जडणघडण कशी झाली आहे याचा अर्थ आपण सहजतेने लावू शकतो. या अशा लोककलांच्या आधाराने या समाजमनाचे आजचे अस्तित्व, आणि त्या अस्तित्वाचे सार्थकत्व वा निरर्थकत्व समजून घेणे शक्य होऊ शकणारे आहे.

लोककला, लोकनाट्य यांच्याकडे एकदा मागे वळून पाहिले तर गोंधळ, कीर्तन, दंडार, खडी गंमत अशा लोकनाट्यानी धर्मशिक्षण, नीतिशिक्षण, व्यावहारिक शिक्षण अशा मानवी समाजाला समर्थपणे जीवन जगण्यासाठी लागणाऱ्या गोष्टी अगदी काल परवापर्यंत शिकविलेल्या आहेत हे आपल्या लक्षात येईल. मुद्रणकला अथवा प्रसारमाध्यमांची निर्मिती होण्यापूर्वी मानवी समाजात स्नेहबंध, जिव्हाळा निर्माण करण्याचे कार्य हे लोकनाट्यानी घडविले आहे. या कला पूर्ण प्रमाण किंवा शुद्ध नसल्या तरी आपल्या भावभावना अभिव्यक्त करण्यासाठी उपयोगी पडणाऱ्या अशा या कला आहेत. त्यामुळे त्यांचे स्थान हे अढळ स्वरूपाचे आहे असे म्हणणे चूक ठरणार नाही.

आजची झपाट्याने बदलत चाललेली सामाजिक परिस्थिती पाहिली तर आपण नेमके कुठे जात आहोत असा विचार मनात आल्याशिवाय राहत नाही. आजची पिढी ही आदर्श हरवून बसलेली आहे, नीतिमूल्याचे महत्त्व विसरून गेली आहे. समाजात सर्वत्र अराजकता, अहिंसा, भयाकूल असे वातावरण निर्माण झाले आहे. समाजशील असणारा मानवप्राणी आपली समाजशीलता हरवून बसलेला आहे, आपली सामाजिक जबाबदारी विसरत चाललेला आहे. तो आत्मकेंद्री वा एकाकी होत चाललेला आहे. व्यक्तीस्वातंत्र्याच्या नावाखाली तो स्वैराचाराने वागतो आहे. ही वाटचाल उद्‌ध्वस्ततेच्या दिशेने असल्याचे तो विसरत चालला आहे.

आज आपल्या विविधतेने नटलेल्या देशात परस्परांमध्ये प्रेम, सामंजस्य, स्नेह, जिव्हाळा आणि आपुलकी निर्माण करावयची असेल, राष्ट्रीय एकात्मता अधिक सुदृढ आणि प्रबळ करावयाची असेल तर समूहमनाची कला असलेल्या लोककलांचा, लोकनाट्याचा आश्रय घेतल्याशिवाय आपल्याकडे दुसरा पर्याय नाही. कलेला मर्यादा नसतात आणि अशी अमर्यादित कला सादर करणाऱ्या लोककलावंतांचा समूह एकत्र आल्याने सर्वांगाने आदानप्रदान होते, त्याने समानता आणि बंधुभाव निर्माण होण्यास मदत होते. एकूणच राष्ट्रउभारणीस या लोककलांचा मोठा हातभार लागतो. असा हा लोककलावंत केवळ कलावंत नसतो तर तो एक समाज शिक्षक आणि सामाजिक नेतृत्व करणारा असा तो व्यक्ती असतो. माणसांमाणसांतील दुरावत चाललेले संबंध कमी करून एक आदर्श समाज निर्माण करण्याची जबाबदारी आपल्यावर येऊन पडलेली आहे. मागच्या काळात ही जबाबदारी लोककलांवर व कलावंतांवर होती, आता या लोककला व लोककलावंतांना टिकविण्याची आणि त्यांना उज्ज्वल

Research Hub International Journal

करण्याची जबाबदारी आपल्यावर येऊन पडली आहे. त्यामुळे त्यादृष्टीने प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून प्रयत्नशील असणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

- डॉ . पु. ना. काळभूत - लोकनाट्य उद्गम आणि विकास
- डॉ. गंगाधर मोरजे - लोकसाहित्य: बदलते संदर्भ - बदलती रूपे
- डॉ. विश्वनाथ शिंदे - लोकसाहित्यमीमांसा

Research Hub International Journal